StudentBounty.com



# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, वर्ग-१ च्या अधिकाऱ्यांकरिता विभागीय परीक्षा

मुंबई, मंगळवार, दिनांक ६ नोव्हेंबर २०१२

[**वेळ :** सकाळी १०-०० ते दुपारी १-००]

(एकूण गुण—१००)

**पेपर क्रमांक १**

**प्रेसी ॲन्ड ड्राफ्टिंग**

(पुस्तकांशिवाय)

**सूचना.**—(१) सर्व प्रश्न सोडवावेत.

(२) प्रत्येक प्रश्नाचे गुण त्या त्या प्रश्नासमोर दर्शविले आहेत.

(३) या परीक्षेकरिता कुठलेही पाठ्यपुस्तक विहित केलेले नाही.

**गुण**

### भाग एक

१. आपण कोषागार अधिकारी / सहाय्यक अधिदान व लेखा अधिकारी म्हणून कार्यरत आहात आणि आपल्या असे निदर्शनास आले आहे की, आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी संक्षिप्त देयकावर आहरित केलेल्या रकमांची सविस्तर ना-देय देयके विहित मुदतीत सादर केलेली नाहीत. अशा देयकांची पडताळणी करून महालेखापालांना पाठविण्यास होणारा विलंब लक्षात घेऊन सर्व संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना सूचनावजा पत्र देऊन नियमातील तरतुदीनुसार आवश्यक कार्यवाही त्वरित करण्याबाबतच्या सूचना आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना देण्याविषयी विभागप्रमुखांना सदर पत्राची प्रत अग्रेषित करा. ३०

२. आपण कृषी विद्यापीठात नियंत्रकपदी कार्यरत असताना विद्यापीठाच्या अखत्यारितील कृषी महाविद्यालयाचे आणि संशोधन केन्द्रे त्यांची मासिक खर्च विवरणे विहित मुदतीत सादर करीत नसल्याने विद्यापीठाचा वार्षिक लेखा विधीमंडळास सादर करणे अडचणीचे ठरत असल्याचे आपल्या निदर्शनास आले आहे. ही बाब महाविद्यालयाच्या आणि संशोधन केन्द्राच्या प्रमुखांना निदर्शनास आणून देऊन खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे वेळेत सादर न केल्याने भविष्यात होणाऱ्या विद्यापीठ आर्थिक व्यवहारावरील परिणामांची जाणीव करून देण्यासाठी द्यावयाचा पत्र मसूदा तयार करा. २०

### भाग दोन

३. खालील उताऱ्याचा एक-तृतीयांश इतका संक्षिप्त सारांश तयार करून त्यास योग्य शीर्षक द्या :— ५०

आजच्या युगातील सर्वात जास्त पिडित व्यक्ती कोण असेल, तर ती म्हणजे ‘ कष्टकरी स्त्री ’ कष्ट हे स्त्रीच्या पाचवीला पुजलेलेच आहेत. मग ती सुशिक्षित असो वा अशिक्षित, लहान असो वा मोठी उच्चवर्णीय असो वा मागासलेल्या वर्गातील असो

www.StudentBounty.com

StudentBounty.com

ग्रामीण भागात विशेषतः आपल्यासारख्या कृषी प्रधान देशात पुरुषाच्या बरोबरीने स्त्री राबते, कष्ट करते, पण स्त्रीची मजुरी ही पुरुषाच्या मजुरीच्या तुलनेने कमी असते. असे का ? स्वतःच्या शेतात पती-पत्नी राबतात. पण दिवसभराचे काम संपल्यावर पुरुष पाय लांब करून विसावा घेतो, पण त्याच घरातील स्त्रीला मात्र घरातील सर्वांसाठी स्वयंपाक करावा लागतो. शहरात सुशिक्षित स्त्री आपल्या नोकरीच्या ठिकाणी आठ-दहा तास काम करून परतते. परतताना तिला प्रवासाचा त्रास सहन करावा लागतो आणि घरी परतल्यावर तिला आपली कौटुंबिक जबाबदारी उचलावी लागते. सुशिक्षित स्त्रीला आपल्या अपत्यांच्या शैक्षणिक वाटचालीतही भाग घ्यावा लागतो. कारण सर्वांना माहित आहे की, कोणतीही सुशिक्षित स्त्री आपल्या मुलांना अशिक्षित ठेवत नाही. मागासलेल्या घरात जन्म घेतलेल्या पण आज महत्त्वाच्या पदावर काम करणाऱ्या अनेक व्यक्तींच्या चरित्रांचा धांडोळा घेतला असता आपल्याला ठामपणे आढळते की, त्याच्या विकासामागे आणि प्रगतीमागे त्यांची आईच असते.

कष्टकरी स्त्रियांची सर्वात मोठी व्यथा म्हणजे कामाच्या ठिकाणी त्यांचे शोषण होत असते. त्यांच्याजवळ शिक्षणाचे कोणतेही प्रमाणपत्र नसते. त्या जे काम करतात त्याबद्दल त्यांच्याकडे कोणतेही प्रमाणपत्र नसते. त्यामुळे मालकांच्या मर्जीवर त्यांच्या कष्टाचे वेतन वा मजुरी अवलंबून असते. त्यांच्या कामाचे स्वरूपही निश्चित नसते. पडेल ते काम त्यांना करावे लागते. वेळेची मर्यादा नसते आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे नोकरी-रोजगाराची हमी नसते. हातपाय थकल्यावर कोणतेही निवृत्तिवेतन नसते. जे मिळते ते अत्यल्प, तोकडे असते. त्यामुळे त्यांना शेवटपर्यंत राबावे लागते. या कष्टकरी स्त्रिया संघटित नसतात, त्यामुळे त्यांना कोणी वाली नसतो.

पुष्कळशा कष्टकरी स्त्रियांचे पती हे व्यसनी असतात. कोणतेही काम करत नाहीत. पत्नीच्या पैशावर जगतात आणि आपले व्यसनही भागवतात. कष्टकरी स्त्रियांच्या जीवनातील ही फार मोठी व्यथा आहे. कष्ट करण्यासाठी बाहेर पडणाऱ्या स्त्रिया तेथेही सुरक्षित नसतात.

या कष्टकरी स्त्रियांचे जगणे अतिशय अवघड असते. कुठेही त्यांचे मत, त्यांची आवड विचारात घेतली जात नाही. गरोदरपणाची व्यथा, क्षय, एड्स इत्यादी वेदनादायी, क्लेशकारक समस्याही अशा स्त्रियांच्या वाट्याला आल्याचे आपण पाहतो. ज्या अपत्यांसाठी त्या आयुष्यभर झगडत असतात ती त्यांची मुलेही त्यांना आनंद, समाधान देत नाहीत. मग त्या झगडत राहतात केवळ जगण्यासाठी !

कष्टकरी स्त्री समाजाचे हे विदारक चित्र एकीकडे गडद आणि स्पष्ट होत जाताना दिसते, पण दुसरे आशादायी आणि प्रेरणादायी स्त्री जीवनाचे चित्रही दिसू लागले आहे हेही मान्य करावे लागेल.

स्त्री जीवनात विसाव्या शतकात मोठ्या प्रमाणात बदल झाले, त्याचे मुख्य कारण म्हणजे तिला सापडलेला शिक्षणाचा मार्ग, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी कर्वे इत्यादी महनीय विभूतींच्या अथक प्रयत्नातून तिला शिक्षणाची कवाडे खुली झाली. पाटी-पेन्सिल हातात घेतलेल्या स्त्रीने महाविद्यालये, विद्यापीठे, संशोधन संस्था अशा उच्च आणि आधुनिक शिक्षणाचे अवघड टप्पे पार केले. आज एकविसाव्या शतकात प्रत्येक क्षेत्रात, प्रत्येक कसोटीत ती पुढे आली आहे. कोणतेही काम तिला अशक्य, असाध्य राहिलेले नाही. अंतराळातही स्त्री भ्रमण करू लागली आहे. राजकारण, समाजकारण, शिक्षण, ज्ञान-विज्ञान अशी अनेकविध क्षेत्रे तिने पादाक्रांत

www.StudentBounty.com

StudentBounty.com

पण हे झाले असामान्य, सर्व सुविधाप्राप्त स्त्री बाबत. सर्वसामान्य स्त्रीबाबत काय आढळते ? विचार करता याच्या गांभिर्याचे अनेक पैलू आपल्यासमोर उलगडत जातात.

स्त्री जगतातील कांही समुहांनी एक सत्य निश्चित जाणले आहे. ती आता कोणावरही अवलंबून राहू इच्छित नाही. ती जास्तीतजास्त स्वावलंबी होऊ इच्छिते. नोकरीबरोबर उद्योग-व्यापार या क्षेत्रातही ती आपले कर्तृत्व दाखवू लागली आहे. कामाप्रमाणे स्त्रीने आपल्या राहणीत, पोषाखातही अनुकूल बदल केले आहेत. शहरी, मध्यम व उच्च आर्थिक सामाजिक समुहातील स्त्रीच्या संदर्भातच अशी ठाम विधाने करण्यासारखी परिस्थिती आहे. परंतु एकूण भारतीय समाजाचा विचार करता असे पदोपदी लक्षात येते आणि अनुभवले जाते की, स्त्रीचे सामाजिक, आर्थिक, स्वातंत्र तिला अतिशय मर्यादित स्वरूपात उपभोगू दिले जाते. हुंडाबळी, बलात्कार, खून अशा मानवी समाजाला काळीमा फासणाऱ्या घटना सातत्याने घडत असतात. तेव्हा समस्त भारतीय समाजजीवनात आर्थिक-सामाजिक-सांस्कृतिक स्तरावर समतेचे आंदोलन सनदशीर मार्गाने सर्व स्तरातून राबवल्याखेरीज समाजोन्नती साध्य करता येणार नाही. यासाठी केवळ शासनस्तरावरील प्रयत्नाबरोबर सामाजिक संस्थांनीही पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे.

भारतीय समाजातील ग्रामीण, कष्टकरी, शेतमजूर स्त्रीच्या समस्या, मागास-आदिवासी स्त्रीच्या समस्या, शहरी-कष्टकरी स्त्रीच्या समस्या, मध्यमवर्गीय स्त्रीच्या समस्या यांचे निराकरण करण्यासाठी प्रत्येक पातळीवर स्वतंत्र विचार करून प्रत्यक्ष कृती करण्याची आवश्यकता आहे. त्याशिवाय भारतीय समाजातील स्त्रीला मानाचे स्थान मिळेल. आत्मनिर्भर, मुक्त स्त्री समाज निर्माण होईल आणि पर्यायाने भारतीय समाज खऱ्या अर्थाने उन्नतीच्या आणि विकासाच्या पथावर सन्मानाने मार्गक्रमण करील. जाचक सामाजिक रूढी-परंपरा, अंधश्रद्धा, जातीयवाद, भेदभाव या अपप्रवृत्तींचे उच्चाटन करणे ही या मार्गातील अत्यंत महत्त्वाचे जटिल आणि क्लिष्ट टप्पे आहेत हेही या निमित्ताने आपण लक्षात घेणे गरजेचे आहे.

[ उलटून पहा

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION**

**DEPARTMENTAL EXAMINATION FOR MAHARASHTRA FINANCE AND ACCOUNTS SERVICE, CLASS-I OFFICERS**

MUMBAI, TUESDAY, 6th NOVEMBER 2012

[Time—10-00 a.m. to 1-00 p.m.]

(Full Marks—100)

**PAPER I**

**PRECIS AND DRAFTING**

*(Without Books)*

*N.B.*—(1) Solve *all* questions.

(2) The marks for each questions are indicated in the margin.

(3) No text book is prescribed for the examination.

**Marks**

**PART I**

1. While working as Treasury Officer / Assistant Pay and Accounts Officer, you observe that Drawing and Disbursing Officers do not furnish the detailed Non-payable bills (NPDC) in prescribed time. These bills have to be scrutinised and furnished to the Accountant General. Taking into account the possible delay, write letter to the concerned Drawing and Disbursing Officers quoting the importance in the light of existing rules and orders and mark a copy of the same letter to the Heads of Departments to take necessary action to comply. 30

2. You are working as a Comptroller in the Agriculture University. You observe that the Agriculture Colleges and Research Centres do not furnish the prescribed information of Monthly Expenditure (MES) to Finance Department of the University. Write letter to all concerned Heads of the Colleges / Institutes to submit the Monthly Expenditure Statements alongwith Utilization Certificates pointing out the importance of these returns stating possibilities of adverse effects on the financial working of the University by non-furnishing the required information. 20

**PART II**

3. Summarise the following passage to about one-third of its length and suggest a suitable title. 50

Structural Adjustment Programme is generally recommended by World Financial Bodies. Such as IMF and the World Bank to countries which are in balance of payments crises having accumulated large external debt which they are unable to service adequately. This

www.StudentBounty.com

StudentBounty.com

secular decline in a country's terms of trade for its exports and / or inappropriate domestic policies and economic management. The policies to be pursued under SAP may vary from country to country yet at least two catagories of measures are common to any such programme. Since the crisis is assumed to be the result of imbalance between supply and demand at the macro level, these two measures include the reduction of overall demand and augmenting supply. In the terminology of IMF / World Bank, the measures concerning demand are usually termed as stabilisation measures and those concerning supply are called structural adjustment measures while a distinction can be made between stabilization and structural adjustment, they follows the same logic. It is like treating the same disease with cusatine action in one case and preventive action in the other. As per IMF / World Bank understanding, the imbalances that lead to financial crisis are at least partly, the result of inadequacy of domestic supply in relation to demand. Once the equilibrium is established by the stabilisation programme, the best way to avoid a repetition of the process is to increase production capabilities. Inadequate supply, in turn is assumed to be the result of inappropriate structures of these economies which are generally characterised by large inefficient loss making public sector, over protected high cost industries oriented towards the domestic market, agricultural price system that discourage production and an over grown Services sector not commensurate with the level of development of these economies. Thus, structural adjustments are meant to reform these economies in a manner that makes them efficient and internationally competitive.

Stabilisation programme meant for demand management in the short run generally consist of (i) budgetory measures such as cuts in investment, and reduction in operating expenditures, (ii) monetory measures ; and (iii) exchange rate policy adjustments. Since most of the government investments are in public works and infrastructural facilities such as electricity, transport, communication and provision of services. Such as health, education, water supply, sanitation, housing etc., any stabilisation measure therefore inevitably involves reduction in these services either by reducing the number of public servants, and / or their real wages or by increasing the price of public utilities or a combination of these measures. Thus cutting down or eliminating subsidies and across the broad increase in the price of public utilities is a part and parcel of any stabilisation measure.

Like cutts in public expenditures, a more restriction monetory policy is a vital element in any stabilisation programme. It helps in bringing down the rate of inflation. The same applies to exchange rate policy. Countries implementing stabilisation programme are required to devalue their currencies. Devaluation, it is argued, helps in correcting distortions in the economy making it more efficient and internationally competitive. It helps in boosting exports and making imports costtier. However, devaluation is not only a stabilisation measure it is also an adjustment measure in the sense that it helps in reallocating inter-

www.StudentBounty.com

StudentBounty.com

As a result of devaluation, internal terms of trade would improve for agriculture. Real profitability of agriculture production would increase thereby encouraging its output and exports. An increase in prices of agricultural goods accompanied by a fall in real incomes wage earners would lead to a fall in demand for food. The decline in demand due to the fall in incomes will specifically hit importable foods leading to a perceptible decline in their demand and prices. This would lead to large import substitution and growth of domestic agricultural incomes.

In contrast to the stabilisation programme, there is no unanimity on the question of policy measures to be adopted under the structural adjustment programme. The measures of reforms to be implemented to increase supply vary according to the economic structure. A comparision of structural adjustment programmes being persuid by various countries designed in co-operation with IMF and the World Bank show that they are inspired by the philosophy of (a) Liberalisation of trade and industrial policies both domestic and foreign, and privatisation of public sector, particularly if it is both large and inefficient.

Domestic Liberalisation, it is argued, is required to establish true prices in both agriculture and non-agricultural sectors. It would involve cutting down subsidies, eliminating public sector monopolies and abolishing of prices and other controls in both agricultural and non-agricultural sectors. The domestic liberalisation component of SAP is particularly important in an economy as that of India which has been characterised by public sector monopolies in a large number of areas, administered pricing in agriculture and a network of licensing and various kinds of other price and output controls in the industrial sector. Another aspect of domestic liberalisation is financial liberalisation under which credit rationing and soft loans are sought to be eliminated. Reforms of capital market are also an integral part of SAP in most countries.

The second and most perhaps important component of the structural adjustment programme is the liberalisation of foreign trade. The countries undergoing SAP are required to introduce measures to promote exports quite apart from devaluation which also has a same objective to achieve. In addition to this, these countries are required to lower import duties and eliminate other restrictions on imports. These steps, it is argued are necessary to induce structural changes in the economy in the long run. The structural reforms would shift resources away from the non traded goods sector to the traded goods sector and within the latter, from import competing activities to export promoting activities.

Apart from resource allocation, increased openness of the economy

www.StudentBounty.com

StudentBounty.com

Privatisation of public sector is recommended not only to improve the efficiency and resource allocation but also to place more reliance on market place and to dismantle controls for relying on prices. In the short run, disinvestment from public sector enterprises can be used to finance the budget deficit, at least partly. In the long run, greater competition between the private and the public sector is expected to lead to more efficiency. It will also increase the accountability of what remains in the public sector. The underlying presumption is that industrialisation based on import substitution and state intervention leads to inefficiency in both resource allocations and resource utilisation.

We have broadly outlined the main characteristics of a classic stabilisation-cum-structural adjustment programme as recommended by IMF / Word Bank to countries facing budgetory and balance of payment crisis.

The list of measures shows that the philosophy behind the SAP, as recommended by IMF/World Bank is to force the recipient countries to manage their economies according to the market economy rules. Incidentally, economic growth per-se is not the immediate priority of the programme but is assumed that the reform will lay the basis for better growth prospect in the medium term or long term.

To fulfill the commitments made to the IMF / World Bank, the Government of India has initiated wide ranging reforms of the policy regime. Investment in infrastructure and other social sectors are being reduced. This is being supplemented with an upward revision in the tariff structure of most of the public utilities. Food and fertilizer subsidies are being cut, though the Government is going slow on this front because of political compulsions. Devaluation of rupee of the order of around 40 per cent has been carried out in three installments. In all but 15 industries, licensing requirement has been abolished. With this more than 85 per cent of Indian Industry has been brought out of the purview of industrial licencing.

In the major industrial policy reform ceiling limit of MRTP companies has been abolished. This has been done to remove barrier to entry for new firms and limit on growth of the size of existing firms. To give greater freedom to the private sector in the allocation of utilization of investable resources, reforms are being carried out in the financial sector of the economy as also in the Capital Markets.

Abolition of the post of controller of capital issues is also a step in this direction.

The company with the external liberalisation recommendations, the Government of India has eliminated most of the quantiture restrictions on imports exception consumer goods. Import duties are

www.StudentBounty.com

StudentBounty.com

being reduced progressively. The exchange rate is being adjusted so as to make exports competitive and imports expensive. In its desire to open up the economy to the rest of the world, the Government of India has not only liberalised foreign trade regime but has also substantially opened the economy to foreign capital and technology. This is being done to expose Indian firms further to international competition. So far the disinvestments from public sector have been very limited and are mainly confined to selling of shares of some profit making public sector financial intitutions. But more and more areas which are earlier reserved for the public sector are being thrown open to the private sector. Thus the intentions of the Government to reduce the role of public sector is clear. Wage freeze in public sector not the immediate agenda of the Government mainly because of its likely political repercussions. Repeated reference to ' exit policy ' and ' golden hand shake ' are however, sending shivers down the spine of Indian Working Class.

www.StudentBounty.com

StudentBounty.com



CON–855

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, वर्ग-१ च्या अधिकाऱ्यांकरिता विभागीय परीक्षा**

मुंबई, मंगळवार, दिनांक ६ नोव्हेंबर २०१२

[ **वेळ** : दुपारी २-३० ते सायंकाळी ५-३० ]

(**एकूण गुण**—१००)

**पेपर क्रमांक** २

**महाराष्ट्र सिव्हिल सर्व्हिसेस रुल्स, वगैरे**

(पुस्तकांसह)

**सूचना.**— (१) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** समासात दर्शविले आहेत.
(२) नियमांची तारतम्यहीन नक्कल केल्यास गुण कमी केले जातील.
(३) उत्तराच्या समर्थनार्थ नियम उधृत करावा.
(४) कोणतेही **पाच** प्रश्न सोडवा.

**गुण**

१. फरक स्पष्ट करा (कोणतेही **पाच**):— २०

| | | |
|---|---|---|
| (अ) | शिकाऊ उमेदवार | परिविक्षाधीन |
| (ब) | तात्पुरती नियुक्ती | स्थायी नियुक्ती |
| (क) | रजा वेतन अंशदान | निवृत्तिवेतन अंशदान |
| (ड) | समश्रेणी | एकरुप श्रेणी |
| (इ) | परिवर्तीत रजा | अर्धवेतनी रजा |
| (फ) | निवृत्तिवेतनार्ह नसलेली सेवा | निवृत्तीवेतनार्ह सेवा. |

२. पुढील दोन वर्षात सेवानिवृत्त होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना वेळेत निवृत्तिवेतन मिळण्यासाठी तुम्ही कोणत्या उपाययोजना अवलंबाल ? कार्यालय प्रमुखाच्या भूमिकेतून स्पष्ट करा. २०

३. विभागीय चौकशीतील दोषारोप पत्र तयार करण्यापासून शिक्षा देण्यापर्यंत समाविष्ट सर्व टप्पे लिहा. २०

४. शासकीय कर्मचाऱ्यांस घरभाडे भत्ता अनुज्ञेय नसलेल्या परिस्थितीची यादी द्या. २०

५. (अ) शासकीय कर्मचारी राजकारण व निवडणुकांमध्ये सहभागी होण्याबाबत कोणत्या तरतुदी नियमांत समाविष्ट आहेत ? १०

(ब) शासकीय कर्मचाऱ्यांचे मत्ता व दायित्व विवरणपत्र सादर करण्याविषयी नियमांत काय तरतुदी आहेत ? १०

६. संक्षिप्त टिपा लिहा (कोणत्याही **चार**) :— २०

(अ) नामनिर्देशन

(ब) प्रपत्र पदोन्नती

(क) विशेष रजा

(ड) धारणाधिकार आणि त्याचे महत्त्व

(इ) प्रवास भत्त्याचे प्रकार

(फ) निवृत्तिवेतनार्ह वेतन

www.StudentBounty.com

StudentBounty.com



# MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

## DEPARTMENTAL EXAMINATION FOR MAHARASHTRA FINANCE AND ACCOUNTS SERVICE, CLASS-I OFFICERS

MUMBAI, TUESDAY, 6TH NOVEMBER 2012

[TIME—2-30 P.M. TO 5-30 P.M.]

(Full Marks—100)

## PAPER II

## MAHARASHTRA CIVIL SERVICES RULES, ETC.

*(With Books)*

*N.B.*— (1) The marks for each question are indicated in the margin.
(2) Indiscriminate copying of the authority will be discounted.
(3) The reference to relevant rules in support to the answer should be given wherever necessary.
(4) Attempt any *five* questions.

**Marks**

1. Distinguish between any *five* of below. State only *two* differences each. 20

| | |
|---|---|
| (*a*) Apprentice | Probationer |
| (*b*) Temporary Appointment | Permanent Appointment |
| (*c*) Leave Salary Contribution | Pension Contribution |
| (*d*) Same Scale | Identical Scale |
| (*e*) Commuted Leave | Half Pay Leave |
| (*f*) Non-Pensionable Service | Pensionable Service. |

2. What measures you will adopt to receive timely pension for Government Servant retiring within next two years ? Describe in capacity of Head of Office. 20

3. Write down all stages involved in Departmental Enquiry right from preparation of charge sheet to execution of penalty. 20

4. Give the list of circumstances under which Government Servant is not entitled for H.R.A. 20

5. (*a*) What are the provisions in the rules regarding taking part in politics and election by a Government Servant ? (Explain the Provisions). 10

(*b*) Explain the provisions in the rules in submission of Statement of Assets and Liability by a Government Servant. 10

6. Write short notes on any *four* :— 20

(*a*) Nomination
(*b*) Proforma Promotion.
(c) Special Leave
(*d*) Lein and its importance
(*e*) Types of Travelling Allowance

www.StudentBounty.com

StudentBounty.com



CON–856

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, वर्ग-१ च्या अधिकाऱ्यांकरिता विभागीय परीक्षा**

मुंबई, बुधवार, दिनांक ७ नोव्हेंबर २०१२

[ **वेळ** : सकाळी १०-०० ते दुपारी १-०० ]

(**एकूण गुण**—१००)

**पेपर क्रमांक ३**

**इंट्रोडक्शन टू इंडियन गव्हर्नमेंट अकाऊन्टस् आणि ऑडिट, वगैरे**

(पुस्तकांशिवाय)

**सूचना.**— (१) प्रश्न क्र. १ अनिवार्य आहे.
(२) प्रश्न क्र. २ ते ६ पैकी कोणतेही **चार** प्रश्न सोडवा.
(३) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** समासात दर्शविले आहेत.

**गुण**

१. थोडक्यात टिपा लिहा (कोणत्याही **चार**) :– २०

(अ) भारताचा एकत्रित निधी
(ब) अर्थोपाय अग्रिम
(क) महसुली परतावा
(ड) वित्तीय औचित्याची तत्वे
(इ) भांडवली लेखा.

२. शासकीय लेखे आणि लेखापरीक्षणाच्या बाबतीत भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे अधिकार व कर्तव्ये काय आहेत ? २०

३. खर्च करणेबाबत कोणत्या मूलभूत अटी आहेत ? खर्चासंबंधी लेखापरीक्षण करताना लेखा-परीक्षकांची कर्तव्ये काय आहेत ? २०

४. लोकलेखा समितीचे अधिकार, कक्षा व कर्तव्ये सविस्तर भाष्य करा. २०

५. व्यापारी लेखापरीक्षण व सरकारी लेखापरीक्षण यातील तुलना तसेच फरक सविस्तर लिहा ? २०

६. (अ) लेखापरीक्षण हे वित्तीय नियंत्रणाचे अभिकरण आहे ; भाष्य करा. १०
(ब) लेखाशीर्षाचे वर्गिकरण समजावून सांगा. १०

www.StudentBounty.com

StudentBounty.com

## MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

---

### DEPARTMENTAL EXAMINATION FOR MAHARASHTRA FINANCE AND ACCOUNTS SERVICE, CLASS-I OFFICERS

MUMBAI, WEDNESDAY, 7TH NOVEMBER 2012

[TIME—10-00 A.M. TO 1-00 P.M.]

(Full Marks—100)

### PAPER III

### Introduction to Indian Government Account and Audit Etc.

(*Without Books*)

*N.B.* —(1) Question No. 1 is compulsory.

(2) Solve any *four* questions, from question Nos. 2 to 6.

(3) Marks for each question are indicated in Margin.

**Marks**

1. Write short notes on (any *four*) :— 20

(*a*) Consolidated Fund of India

(*b*) Ways and Means Advance

(*c*) Refund of Revenue

(*d*) Canons of Financial Propriety

(*e*) Capital Account.

2. What are the duties and powers of Comptroller and Auditor General of India regarding Government Audit and Accounts ? 20

3. What are the essential conditions governing expenditure ? What are the duties of Auditor in conducting audit of expenditure ? 20

4. Explain in detail scope and functions of Public Accounts Committee. 20

5. Compare in detail the Commercial Audit and the Government Audit. 20

6. (*a*) Audit is an Agency of financial control ; comment. 10

(*b*) Explain the classification of heads of accounts. 10

---

www.StudentBounty.com

StudentBounty.com

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, वर्ग-१ च्या अधिकाऱ्यांकरिता विभागीय परीक्षा

मुंबई, बुधवार, दिनांक ७ नोव्हेंबर २०१२

[ **वेळ** : दुपारी २-३० ते सायंकाळी ५-३० ]

(एकूण गुण—१००)

**पेपर क्रमांक ४**

**कमर्शियल बुक-किपिंग**

(पुस्तकांशिवाय)

**सूचना.**— (१) प्रश्न क्रमांक **एक** सोडविणे अनिवार्य आहे.
(२) उर्वरित प्रश्नांपैकी कोणतेही **चार** प्रश्न सोडवा.
(३) प्रत्येक प्रश्नासाठीचे गुण समासामध्ये दर्शविले आहेत.

गुण

१. श्री. पाटील यांचा किरकोळ विक्रीचा व्यवसाय असून दिनांक ३१ मार्च २०१२ रोजीचे त्यांचे तेरीजपत्रक खालीलप्रमाणे आहे :— ४०

**तेरीजपत्रक**

| विवरण | | नावे (रुपये) | जमा (रुपये) |
|---|---|---|---|
| खरेदी | . . | ५,६५,६२५ | . . . |
| विक्री | . . | . . . | ७,०६,६५० |
| विक्री परतावा | . . | ४,२५० | . . . |
| खरेदी परतावा | . . | . . . | ३,१२० |
| संशयित कर्जासाठी तरतूद | . . | . . . | ५,२०० |
| किरकोळ ऋणको | . . | ३८,२०० | . . . |
| किरकोळ धनको | | . . . | २५,५२६ |
| हुंडी देणे | . . | . . . | ८,९५० |
| साठा (वर्षाच्या सुरुवातीस असलेला) | . . | ५६,७२५ | . . . |
| मजूरी | . . | २०,१३७ | . . . |
| वेतन | . . | १८,५७५ | . . . |
| फर्निचर | . . | १५,०७५ | . . . |
| दुकानातील फेरबदल | . . | ४,५०० | . . . |
| पोस्टेज, साहित्य इत्यादी | . . | १३,२२६ | . . . |
| वीज वापर व हिटींग | . . | २,३५० | . . . |
| व्यापारी खर्च | . . | १०,३१४ | . . . |
| भाडे व कर | . . | १३,५१७ | . . . |
| बुडीत कर्जे | . . | ५२५ | . . . |
| डी. राजा यास १५ टक्के दराने दिलेले कर्ज १ डिसेंबर २०११ | . . | ३,००० | . . . |
| गुंतवणुकी (at cost) | . . | ११,५०० | . . . |
| गुंतवणुकीवरील डिव्हीडंड | . . | . . . | १,८२५ |
| शिल्लक विमा | . . | ५२४ | . . . |
| शिल्लक-हातातील व बँकेतील | . . | १५,७५२ | . . . |
| हुंडी येणे | . . | १९,०७० | . . . |
| भांडवली खाते | . . | . . . | ७७,००० |
| उचल खाते | . . | १६,००० | . . . |
| प्रलंबित मजूरी | . . | . . . | २,०१९ |
| प्रलंबित भाडे (देय) | . . | . . . | ७५० |
| फर्निचरवरील घसारा | . . | १,६७५ | . . . |
| फर्निचरची वाढ | . . | ५०० | . . . |

www.StudentBounty.com

दिनांक ३१ मार्च २०१२ रोजीचे उपरोक्त तेरीज पत्रकावरून व्यापारी व नफा-तोटा लेखे आणि त्या रोजीचा ताळेबंद खालील माहितीच्या आधारे तयार करा :—

(१) किरकोळ ऋणको मधे, रुपये २५० ची विक्रेत्याकडील स्वतःची उधारी व रुपये ६०० ची नादार गिऱ्हाईकाकडील बाकीचा समावेश आहे.

(२) बुडीत कर्जापोटी निर्लेखनासाठी किरकोळ ऋणकोंच्या ५% राखीव.

(३) दुकान दुरूस्तीपोटीचा १/५ खर्च निर्लेखित करावा.

(४) रुपये १००० चा माल जळाला; परंतु विमा कंपनीने रुपये ७०० चा दावा स्वीकारला.

(५) हुंडी येणे यात परत आलेल्या रुपये २,६५० च्या वचनचिठ्ठीचा समावेश आहे.

(६) वर्षाच्या शेवटचा साठा रुपये ६०,५२०.

(७) रुपये १,००० चा गिऱ्हाईकाकडील धनादेश न वटल्याबद्दल बँकेनी दिलेली सूचना अद्याप लेख्यात नोंदविली नाही.

२. संयुक्त उपक्रम म्हणजे काय ? संयुक्त उपक्रम व भागीदारी यातील फरकांबाबत तपशीलवार लिहा. १५

३. घसाऱ्याची व्याख्या स्पष्ट करा. घसारा काढण्याच्या विविध पद्धती विशद करा. १५

४. आय व व्यय आणि उत्पन्न व खर्च पत्रके यातील फरकाच्या बाबींवर सविस्तर लिहा. १५

५. टिपा लिहा (कोणत्याही **चार**) :— १५

(अ) ख्याती
(ब) वचनचिठ्ठी
(क) रोख सवलत आणि व्यापारी सवलत
(ड) द्विनोंद पद्धतीचे फायदे
(इ) संस्थांचे विलीनीकरण.

६. तेरीजपत्रक; तेरीजपत्रक बनवण्याचे उद्देश; तेरीजपत्रक आणि ताळेबंद यातील फरक आणि तेरीजपत्रक तयार करण्याच्या पद्धतीबद्दल लिहा. १५

StudentBounty.com

www.StudentBounty.com

StudentBounty.com

# MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

## DEPARTMENTAL EXAMINATION FOR MAHARASHTRA FINANCE AND ACCOUNT SERVICE, CLASS-I OFFICER'S

MUMBAI, WEDNESDAY, 7th NOVEMBER 2012

[TIME—2-30 P.M. TO 5-30 P.M.]

(Full Marks—100)

## PAPER IV

### Commercial Book-Keeping

(*Without Books*)

*N.B.*—(1) Question No. *one* is compulsory.

(2) Solve any *four* questions from rest of the questions.

(3) The marks for each question are indicated in the margin.

**Marks**

1. Mr. Patil carries on retail business and his Trial Balance on March 31st, 2012 was as follows :— 40

*Trial Balance*

| Particulars | Debit Rs. | Credit Rs. |
|---|---|---|
| Purchases .. | 5,65,625 | ... |
| Sales .. | ... | 7,06,650 |
| Return Inwards .. | 4,250 | ... |
| Return Outwards .. | ... | 3,120 |
| Provision for doubtful Debts. .. | ... | 5,200 |
| Sundry debtors .. | 38,200 | ... |
| Sundry creditors | ... | 25,526 |
| Bills payable .. | ... | 8,950 |
| Stock (in the begining of the year) .. | 56,725 | ... |
| Wages .. | 20,137 | ... |
| Salaries .. | 18,575 | ... |
| Furniture .. | 15,075 | ... |
| Alterations to shop .. | 4,500 | ... |
| Postage, stationary etc. .. | 13,226 | ... |
| Heating and lighting .. | 2,350 | ... |
| Trade expenses .. | 10,314 | ... |
| Rent, Rates and Taxes .. | 13,517 | ... |
| Bad debts .. | 525 | ... |
| Loan at 15 percent to D. Raja 1st December 2011 .. | 3,000 | ... |
| Investments (at Cost) .. | 11,500 | ... |
| Dividends from Investments .. | ... | 1,825 |
| Unexpired Insurance .. | 524 | ... |
| Cash on hand and at Bank .. | 15,752 | ... |
| Bills receivable .. | 19,070 | ... |
| Capital account .. | ... | 77,000 |
| Drawings account .. | 16,000 | ... |
| Outstanding wages .. | ... | 2,019 |
| Rent accured but not paid .. | ... | 750 |
| Depriciation on furniture .. | 1,675 | ... |
| Additions to furniture | 500 | |

www.StudentBounty.com

Prepare the Trading and Profit and Loss Account as on 31st March, 2012 and Balance sheet as on that date having regard to the following information :—

(1) Sundry Debtors include an item of Rs. 250 for goods supplied to the proprietor and an item of Rs. 600 due from a customer who has become insolvent.

(2) Provision for doubtful debts is to be maintained at 5 percent of the Sundry Debtors.

(3) One-fifth of the alterations to the shop is to be written off.

(4) Goods of the value of Rs. 1,000 have been destroyed by fire and the Insurance Company has admitted the claim for Rs. 700 only.

(5) Bills Receivable include a dishonoured promissory note for Rs. 2,650.

(6) Stock at end of the year was Rs. 60,520.

(7) An intimation from the bank that a customers cheque of Rs. 1,000 had been dishonoured is still to be entered in the books.

2. What is meant by Joint Venture ? Describe in detail the difference between Joint Venture and Partnership. 15

3. Define Depriciation. Explain in detail different methods of calculation of depriciation. 15

4. Write in detail about differences between Receipt and Payment Account and Income and Expenditure Account. 15

5. Write short notes (any *four*) :— 15

(*a*) Good will

(*b*) Promissory note

(*c*) Cash discount and Trade discount

(*d*) Advantages of double entry

(*e*) Amalgamation of firms.

6. Write about Trial Balance; objectives of preparing Trial Balance; distinction between Trial Balance and Balance Sheet and methods of preparing Trial Balance. 15

StudentBounty.com

www.StudentBounty.com

StudentBounty.com

CON–858

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, वर्ग-१ च्या अधिकाऱ्यांकरिता विभागीय परीक्षा**

मुंबई, गुरुवार, दिनांक ८ नोव्हेंबर २०१२

[ **वेळ** : सकाळी १०-०० ते दुपारी १-०० ]

(**एकूण गुण**—१००)

**पेपर क्रमांक ५**

**भारताचे संविधान**

(पुस्तकांशिवाय)

**सूचना.**— (१) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** समासात दर्शविलेले आहेत.
(२) प्रश्न क्र. १ अनिवार्य असून उर्वरित प्रश्न क्र. २ ते ६ पैकी कोणतेही **चार** प्रश्न सोडवा.
(३) जास्त प्रश्न सोडविल्यास जास्तीच्या प्रश्नांना गुण दिले जाणार नाही.

**गुण**

१. निवडणूक आयोगाचे अधिकार व निवडणुकविषयक बाबींमध्ये हस्तक्षेप करण्यास न्यायालयांना असणारा प्रतिबंध स्पष्ट करा. २०

२. टिपा लिहा (कोणत्याही **चार**) :— २०
(अ) आणीबाणी
(ब) नागरिकत्व
(क) वित्त आयोग
(ड) शिक्षणाचा हक्क
(इ) जनहित याचिका.

३. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ७२ अन्वये राष्ट्रपतींना विवक्षित प्रकरणी क्षमा, इत्यादी करण्याचा आणि शिक्षादेश निलंबित करण्याचा, त्यात सूट देण्याचा किंवा शिक्षा सौम्य करण्याचा अधिकार स्पष्ट करा. २०

४. धन विधेयक व धन विधेयकाबाबतची विशेष कार्यपद्धती स्पष्ट करा. २०

५. पंचायतीची रचना व घटना स्पष्ट करा. २०

६. राज्य धोरणांची निदेशक तत्वे स्पष्ट करा. २०

[ उलटून पहा

www.StudentBounty.com

StudentBounty.com

# MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

## DEPARTMENTAL EXAMINATION FOR MAHARASHTRA FINANCE AND ACCOUNTS SERVICE, CLASS-I OFFICERS

MUMBAI, THURSDAY, 8TH NOVEMBER 2012

[TIME—10-00 A.M. TO 1-00 P.M.]

(Full Marks—100)

## PAPER V

### Constitution of India

(*Without Books*)

*N.B.*— (1) The marks for each question are indicated in Margin.
(2) Question No. 1 is compulsory ; solve any *four* questions, from question Nos. 2 to 6.
(3) Questions solved excess will not be evaluated.

**Marks**

1. Define jurisdiction and powers of Election Commission and bar to interference by Court in electoral matters. 20

2. Write short notes (any *four*) :— 20

(*a*) Emergency

(*b*) Citizenship

(*c*) Finance Commission

(*d*) Right to Education

(*e*) Public Interest Litigation.

3. Define the power of president to grant pardons etc. and to suspend, remit or commute sentences in certain cases under article 72 of Constitution of India. 20

4. Define Money Bill and the special procedure in respect of Money Bill. 20

5. Define Constitution and composition of Panchayats. 20

6. Define the directive principles of State Policy. 20

www.StudentBounty.com

StudentBounty.com

085

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, वर्ग-१ च्या अधिकाऱ्यांकरिता विभागीय परीक्षा**

मुंबई, गुरुवार, दिनांक ८ नोव्हेंबर २०१२

[ **वेळ** : दुपारी २-३० ते सायंकाळी ५-३० ]

**(एकूण गुण—**१००)

**पेपर क्रमांक ६**

**बॉम्बे फायनान्शियल रुल्स, महाराष्ट्र ट्रेझरी रुल्स इत्यादी**

(पुस्तकांसह)

**सूचना.**— (१) कोणतेही **पाच** प्रश्न सोडवा.

(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** समासात दर्शविले आहेत.

(३) उत्तरात संबंधित अधिनियम, कलम, नियम, इ. नमूद करावेत.

(४) प्राधिकाराची केवळ नक्कल केल्यास गुण दिले जाणार नाही.

**गुण**

१. अर्थसंकल्प तयार करणे व तो विधीमंडळास सादर करणे याबाबत सविस्तरपणे स्पष्ट करा. २०

२. (अ) शासकीय कर्मचाऱ्यांच्या कालबाह्य देयकांच्या रकमा प्रदान करण्याबाबत वित्तीय नियमातील तरतुदी विशद करा. १०

(ब) शासकीय कार्यालयांच्या रोखपेट्या व मौल्यवान वस्तू कोषागाराच्या सुरक्षा कक्षात ठेवण्याबाबतच्या तरतुदी स्पष्ट करा. १०

३. (अ) भविष्यनिर्वाह निधीतून ना-परतावा अग्रिमाशी संबंधित तरतुदी स्पष्ट करा. १०

(ब) वित्तीय नियमाखाली मंजूर करण्यात येणारी व्याजी अग्रिमे कोणती ? थोडक्यात स्पष्ट करा. १०

४. (अ) आकस्मिक खर्चाचे वर्गीकरण नमूद करून विशेष आकस्मिक खर्चाबाबत माहिती द्या. १०

(ब) " खर्चाची नवीन बाब " संबंधी थोडक्यात विवेचन करा. १०

५. थोडक्यात टिपा लिहा (कोणत्याही **चार**) :— २०

(अ) प्रतिस्वाक्षरित आकस्मिक खर्च

(ब) ठेव संलग्न विमा योजना

(क) व्यपगत ठेवी व त्याची प्रदाने

(ड) हानीचे निर्लेखन

(इ) भारित खर्च.

६. फरक स्पष्ट करा (कोणतेही **चार**) :— २०

(अ) इसारा रक्कम आणि सुरक्षा ठेव

(ब) विनियोजन आणि पूनर्विनियोजन

(क) तात्पुरते अग्रिम आणि स्थायी अग्रिम

(ड) पांढरे पुस्तक आणि हिरवे पुस्तक

(इ) देयक आणि प्रमाणक.

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION**

**DEPARTMENTAL EXAMINATION FOR MAHARASHTRA FINANCE AND ACCOUNTS SERVICE, CLASS-I OFFICER'S**

MUMBAI, THURSDAY, 8TH NOVEMBER 2012

[TIME—2-30 P.M. TO 5-30 P.M.]

(Full Marks—100)

**PAPER VI**

**Bombay Financial Rules, Maharashtra Treasury Rules, Etc.**

(*With Books*)

Marks

*N.B.*—(1) Attempt any *five* questions.

(2) The marks for each question are indicated in margin.

(3) The reference to relevant Act, section, rules in support of the answer should be given wherever necessary.

(4) Indiscriminate copying of an authority will be discounted.

1. Describe in details the procedure for preparation of Budget and its submission in Legislature. 20

2. (*a*) State the provisions regarding passing the bills of time barred claims of Government Servants. 10

(*b*) Describe the procedure for depositing cash chests and valuables in the treasury. 10

3. (*a*) Explain in brief the provisions regarding non-refundable advance from G.P.F. 10

(*b*) Which different interest bearing advances can be sanctioned to Government Servants under the financial rules ? State in brief. 10

4. (*a*) State the classification of contingent expenditure and explain in brief about special contingency. 10

(*b*) Describe in brief " New Expenditure ". 10

5. Give short notes (any *four*) :— 20

(*a*) Countersigned Contingencies.

(*b*) Deposit linked insurance scheme

(*c*) Lapsed Deposits and their payments

(*d*) Write off of Losses

(*e*) Charged Expenditure.

6. Differentiate between (any *four*) :— 20

(*a*) Earnest Money and Security Deposit

(*b*) Appropriation and Re-Appropriation

(*c*) Temporary Advance and Permanent Advance.

www.StudentBounty.com

Con 860

StudentBounty.com

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, वर्ग-१ च्या अधिकाऱ्यांकरिता विभागीय परीक्षा

मुंबई, शुक्रवार, दिनांक ९ नोव्हेंबर २०१२

[ **वेळ** : सकाळी १०-०० ते दुपारी १-०० ]

(एकूण गुण—१००)

**पेपर क्रमांक ७**

**अकाऊंटस् कोड, भाग १, वगैरे**

(पुस्तकांसह)

**सूचना.**—(१) कोणतेही **पाच** प्रश्न सोडवा.

(२) उजवीकडील समासात प्रश्नाचे **गुण** दर्शविलेले आहेत.

(३) उत्तराच्या पृष्ठ्यर्थ प्राधिकार नमूद करावा.

(४) पुस्तकातून प्राधिकार तंतोतंत उतरवून लिहिल्यास गुण कमी होतील.

| | | गुण |
|---|---|---|
| १. | थोडक्यात टिपा लिहा :—<br>(अ) प्रशासकीय मान्यता<br>(ब) मोजमाप नोंदवही<br>(क) कायम अग्रिम<br>(ड) सुरक्षा अनामत | २० |
| २. | सार्वजनिक बांधकाम विभागातील 'विभागीय लेखापालाची' कर्तव्ये व कार्ये नमूद करा. | २० |
| ३. | सार्वजनिक बांधकाम विभागातील रोखपुस्तिका पडताळणी संदर्भात तरतुदीचे तपशीलवार वर्णन करा. | २० |
| ४. | जिल्हा परिषदेच्या 'मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्याची' कर्तव्ये व कार्ये नमूद करा. | २० |
| ५. | जिल्हा परिषदेच्या वित्त विभागात प्रदानार्थ प्राप्त होणाऱ्या वेगवेगळ्या देयकाचे प्रकार नमूद करा. त्याची सविस्तर तपासणी कशी करण्यात येते ते विशद करा. | २० |
| ६. | (अ) जिल्हा परिषदेतील लेखा आक्षेपाचे निराकारण. | १० |
| | (ब) परिषदेत अंतर्गत लेखा परीक्षणासाठी कोणते सर्वसाधारण आर्थिक तत्त्वाचे पालन करणे आवश्यक आहे. | १० |

www.StudentBounty.com

P.A

StudentBounty.com

MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

DEPARTMENTAL EXAMINATION FOR MAHARASHTRA FINANCE AND ACCOUNTS SERVICE, CLASS-I OFFICER'S

MUMBAI, FRIDAY, 9TH NOVEMBER 2012

[TIME 10-00 A.M. TO 1-00 P.M.]

(FULL MARKS—100)

## PAPER VII

## ACCOUNTS CODE, PART I, ETC.

*(With Books)*

*N.B.*—(1) Answer any *five* questions.

(2) Marks are indicated to the right side of margin for each question.

(3) Quote authority in support of your answer.

(4) Marks will be deducted for Indiscriminate copying.

**Marks**

1. Write short notes on :— 20
   - (*a*) Administrative Approval
   - (*b*) Measurement Book
   - (*c*) Permanent Advance
   - (*d*) Security Deposit

2. What are the duties and functions of 'Divisional Accountant' in Public Works Department. 20

3. Describe in detail the instructions regarding verification of cash book in Public Works Department. 20

4. What are the duties and function of 'Chief Accounts and Finance Officer' in Zilla Parishad. 20

5. List out the different kinds of bill which are received for payment in Finance Department of Zilla Parishad? Explain how they are scrutinized. 20

6. (*a*) Settlement of Audit objections in Parishad. 10

   (*b*) Enumerate the general financial principles with respect to Enternal Audit of a Parishad. 10

www.StudentBounty.com

CON–861

StudentBounty.com

080

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, वर्ग-१ च्या अधिकाऱ्यांकरिता विभागीय परीक्षा**

मुंबई, शुक्रवार, दिनांक ९ नोव्हेंबर २०१२

[ **वेळ** : दुपारी २-३० ते सायंकाळी ५-३० ]

**(एकूण गुण—१००)**

**पेपर क्रमांक ८**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम १९६१, वगैरे**

(पुस्तकांसह)

**सूचना.**— (१) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** समासात दर्शविले आहेत.

(२) पुस्तकातील मजकूर जसाच्या तसा उतरविल्यास गुण कमी केले जातील.

(३) अपेक्षित प्रश्नांपेक्षा जास्त प्रश्न सोडविल्यास जास्तीच्या प्रश्नांना गुण दिले जाणार नाहीत.

**गुण**

१. संक्षिप्त टिपा लिहा (कोणत्याही **चार**) :— २०

(अ) जिल्हा परिषदेच्या कारभारासंबंधी चौकशी

(ब) जिल्हा परिषद विसर्जित करण्याचा राज्य शासनाचा अधिकार व परिणामरुप तरतुदी

(क) लेखा परीक्षेसाठी आपले लेखे सादर करण्याची स्थानिक प्राधिकरणांची जबाबदारी

(ड) सरपंच व उप सरपंच यांचे विरुद्ध अविश्वासाचा प्रस्ताव

(इ) मान्य शाळा.

२. जिल्हा परिषदेचे स्वच्छता विषयक व इतर अधिकार सविस्तरपणे विशद करा. २०

३. जिल्हा परिषदेचे कर किंवा फी गोळा करणेचे अधिकार सविस्तरपणे विशद करा. २०

४. मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियमामध्ये आयुक्तांना असलेले अधिकार सविस्तरपणे विशद करा. १०

५. ग्रामपंचायतीचे प्रशासकीय अधिकार व कर्तव्ये सविस्तरपणे विशद करा. १०

६. ग्रामपंचायतीची मालमत्ता व निधी याबाबत सविस्तरपणे लिहा. १०

७. शाळा मंडळांबाबत सविस्तरपणे लिहा. १०

www.StudentBounty.com

StudentBounty.com

# MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

## DEPARTMENTAL EXAMINATION FOR MAHARASHTRA FINANCE AND ACCOUNTS SERVICE, CLASS-I OFFICERS

MUMBAI, FRIDAY, 9TH NOVEMBER 2012

[TIME—2-30 P.M. TO 5-30 P.M.]

(Full Marks—100)

## PAPER VIII

**Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961, Etc.**

*(With Books)*

*N.B.*—(1) Marks for each question are indicated in the Margin.
(2) Indiscriminate copying of sections of an authority will be discounted.
(3) No marks will be given, if any questions answered in excess than as expected.

**Marks**

1. Write short notes on (any *four*) :— 20
   (*a*) Inquiry into affairs of Zilla Parishads
   (*b*) Power of State Government to dissolve or supersede of Zilla Parishad and consequential provisions.
   (*c*) Liability of local authorities to submit their account's for audit.
   (*d*) Motion of no confidence against Sarpanch and Upa Sarpanch.
   (*e*) Approved schools.

2. Describe in details, sanitary and other powers of Zilla Parishads. 20

3. Describe in details power's of collection of Taxes or Fees of Zilla Parishads. 20

4. Describe in details Power's of Commissioner laid down under Bombay Local Fund Audit Act. 10

5. Describe in details Administrative powers and duties of village panchayats. 10

6. Describe in details regarding property and fund of village panchayats. 10

7. Describe in details regarding school boards. 10

www.StudentBounty.com